# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 02/0९/2017

## प्रेस नोट

## 06 कुख्यात गुंड दोन वर्षासाठी हद्दपार.

दि. 02.09.2017- शहरातील कायदा व सुव्यवस्था टिकून ठेवण्यासाठी जास्तीत जास्त गुंडांना तडीपार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे शहरात शांतता रहावी यासाठी उपाययोजना करण्याचे नियोजन पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी केले आहे. सर्व गुंड प्रवृतीच्या गुन्हेगार यांचे विरुद्ध दोन किंवा त्यापेक्षा जास्त गुन्ह्याची नोंद आहे. तसेच त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करून काही सुधारणा होत नसल्याने हद्दपारीची कारवाई करण्यात येते. मागील महिन्यामध्ये पोलीस उप आयुक्त परिमंडळ II यांनी सहा सराईत गुन्हेगारांना दोन वर्षासाठी शहर व जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. त्यात १) विजय सुभाष बिरारे रा.विष्णू नगर, जवाहर कॉलनी, २) मयूर अशोक कऱ्हाळे रा. विष्णू नगर, जवाहर कॉलनी, ३) नितीन उर्फ नित्या रघुनाथ हिवराळे रा.शहानगर मसनतपूर, ४) अनिल प्रकाश पौळ रा.मिलिंद नगर उस्मानपुरा, 5) विनोद विजय बतासे रा. मिलिंद नगर,उस्मानपुरा 6) सौरभ नानासाहेब वानखेडे रा. त्रिवेणीनगर एन 7, या सराईत गुन्हेगारांना दोन वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. या गुन्हेगारांविरुद्ध विविध पोलीस स्टेशनला चोरी घरफोडी, जीवे मारण्याचा प्रयत्न, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत करणे अशा स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याने त्यांना या गुन्ह्यामध्ये अटक करून व प्रतीबधक कारवाई करूनही त्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नाही त्यामुळे त्यांच्या गुन्हेगारी कारवाईस प्रतिबंधक व्हावा म्हणून पोलीस उप आयुक्त परिमंडळ II राहुल श्रीरामे यांनी या सहा गुन्हेगारांना मागील महिन्यात शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षा करिता हद्दपार केले आहे. अशी माहिती परिमंडळ दोन कार्यालय यांनी दिली आहे.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर
डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि.02/09/2017.

## <u>प्रेस नोट</u>

## पोलीस आयुक्तालय हद्दीत ऑल आउट ऑपरेशन.

दि.02.09.2017 - पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये गणेश उत्सव व बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर दि.01/09/2017 रोजी ऑपरेशन ऑल आउट मोहिम राबविण्यात आली. शुक्रवारी तीन तास पोलीस ठाणे हद्दीतील प्रमुख चौकात नाकाबंदी करण्यात आली. अशा प्रकारे पोलीस आयुक्तालयामध्ये एकाच वेळी शहरातील 17 पोलीस ठाण्यातील हद्दीत प्रमुख चौकात नाकाबंदी दरम्यान दुचाकी, चारचाकी, वाहन थांबवून वाहन परवाना, सीटबेल्ट, हेल्मेट, वाहन परवाना तपासण्यात आला. तसेच आयुक्तालयातील मॉल्स, लॉजेस, हॉटेल, ढाबे चेक करण्यात आले. यामध्ये दोषी सापडलेल्या व्यक्ती विरुद्ध तातडीने दंडात्मक कारवाई करण्यात आली.

ऑल आउट ऑपरेशन दरम्यान पोलीस आयुक्तालय अंतर्गत असलेल्या पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी व शाखा प्रभारी अधिकारी यांच्या पथकाने 1) 2253 वाहने चेक केले व मोटार वाहन कायद्या अंतर्गत 647 केसेस करून 1,76,700/- रु. चा दंड वसूल केला.2) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत 09 दारूच्या केसेस करून 09 आरोपींना अटक करून किंमत 15,668/- रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. 3) पोलीस स्टेशन स्तरावर 28 वारंटची बजावणी केली. तसेच 05 इसमान विरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाही करण्यात आली. BDDS पथकाने छावणी ईदगाह, रोजेबाग ईदगाह, रिलायन्स मॉल, शहनुरमिया दर्गा, D-Mart मॉल, रेल्वे स्टेशन, मध्यवर्ती बसस्थानक, या परीसरामध्ये घातपात विरोधी तपासणी केली. तसेच शहरातील 103 हॉटेल/लॉजेस चेक करण्यात आले. पोलीस आयुक्त यशस्वी यादव, पोलीस उप आयुक्त डॉ.दिपाली धाटे-घाडगे, विनायक ढाकणे, राहुल श्रीरामे यांच्या अधिपत्याखाली 79 पोलीस अधिकारी व 390 पोलीस कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 02/0९/2017

<u>प्रेस नोट</u>

## संशयितरीत्या फिरणाऱ्या आरोपीस सातारा पोलिसांनी केली अटक.

दि.02.08.2017- 01 सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास संशयितरीत्या जालन नगर येथील गार्डन जवळ फिरणाऱ्या इसमाला सातारा पोलिसांनी पकडून त्याच्यावर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 122 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाबासाहेब भीमराव शिंदे रा.राहुल नगर गल्ली नं.04 असे आरोपीचे नाव आहे. सातारा पोलिसांनी अधिक माहिती दिली की पोलीस हवालदार संजय चव्हाण हे 01 सप्टेंबर रोजी हद्दीमध्ये गस्त करीत असताना रात्रीच्या सुमारास जालन नगर गार्डन जवळ अंधारात एक इसम संशयास्पदरीत्या दिसून आला. त्यास त्या भागात फिरण्याचे कारण विचारले असता त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली व त्याचे अस्तित्व लपवून काहीतरी मोठा गुन्हा करण्याच्या उद्देशाने आरोपी बाबासाहेब भीमराव शिंदे हा मिळून आला म्हणून पोलीस हवालदार संजय चव्हाण यांनी सरकारतर्फे फिर्यादी होऊन गुन्हा दाखल केला असून पुढील अधिक तपास सातारा पोलीस स्टेशनचे सहा.फौ/ बी.राठोड हे करीत आहेत.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 02/0९/2017

<u>प्रेस नोट</u>

**बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी करुन शांतेत पार पाडली.**

दि.02.08.2017- आज रोजी मुस्लीम बाधवांची बकरी ईद ही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बकरी ईद निमित्त सकाळी 08.30 ते 10.00 वाजे दरम्यान मुस्लीम बाधवांनी शहरातील छावणी, उस्मानपुरा, रोजेबाग व शहाशोक्ता इदगाह तसेच शहागंज मस्जिद, पाणचक्की मस्जिद आणि शहरातील इतर प्रमुख मस्जिद, दर्गाह, इदगाह मध्ये जाऊन बकरी-ईद ची नमाज अदा करण्यात आली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात शहर पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता. छावणी ईदगाह येथे सुमारे 35000/- मुस्लीम बाधवांनी बकरी ईदची नमाज अदा केली. छावणी ईदगाह येथे शहराचे पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी सर्व मुस्लीम बाधवांना बकरी ईदच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या वेळेस पोलीस उप आयुक्त परिमंडळ I विनायक ढाकणे, सहा.पोलीस आयुक्त गोवर्धन कोळेकर, पोलीस निरीक्षक इंदलसिंग बहुरे, व इतर अधिकारी व कर्मचारी यांनी देखील मुस्लीम बाधवांना बकरी ईदच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. शहरातील सर्व ठिकाणांची नमाज अदा करण्याचा कार्यक्रम हा शांततेत पार पडला आहे.

SD/-

(रामेश्वर थोरात)

सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)

औरंगाबाद शहर